


# पारनेर दर्शन





वर्ष ३ अंक २८८, गुरुवार ६ नोव्हेंबर २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# मनमाड रस्ता मीच पूर्ण करणार !

**| सहा वर्षे थांबलेलं काम आता रूळावर आलंय**
**| डॉ. सुजय विखेंच्या टीकेला खा. लंके यांचे प्रत्युत्तर**

अहिल्यानगर : प्रतिनिधी

नगर-मनमाड महामार्गाचं चौपदरीकरण पुन्हा एकदा राजकीय संघर्षाचं केंद्रबिबंदू ठरलं आहे. या प्रकल्पाचे श्रेय कोणाला हा प्रश्न आता खुलेआम विचारला जात असताना विद्यमान खासदार नीलेश लंके यांनी स्पष्ट शब्दात सांगितलं की, लोकांना श्रेय नव्हे, रस्ता हवा आहे. काम गतीने सुरू व्हावे हेच माझे उत्तर आहे.



### फक्त आश्वासन, गती नाही

माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी पत्रकार परिषदेत आरोपक केला होता की, नगर-मनमाड महामार्गाचं काम मी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना सादर केलेल्या प्रस्तावानुसार मंजुर झालं. मात्र सध्याचे खासदार नीलेश लंके हे फक्त पाठपुरावा केला म्हणत स्वतः श्रेय घेत आहेत, प्रत्यक्ष कामाचा वेग अद्याप दिसत नाही. त्यांनी सांगितले की, कामाच्या फलकावर माझ्या कार्यकाळात मंजुरी लिहिलेली स्पष्ट दिसत आहे. नवीन ठेकेदार बदलला हे ठीक पण अद्याप लोकांना सुधारलेला रस्ता कुठेच दिसत नाही.

### तुमच्या कार्यकाळात काम सुरूच झालं नाही !

खासदार नीलेश लंके यांनी डॉ. विखे यांच्या आरोपांना ठाम उत्तर दिले. ते म्हणाले, सहा वर्षापूव तुमचं सरकार, तुमचा कार्यकाळ आणि तरही रस्ता रखडलेलाच राहिला. मी खासदार होउन फक्त एक वर्ष झालंय, पण आता काम सुरू आहे. हा फरक जनतेला दिसतो आहे. लंके यांनी सांगितलं की त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मंत्रालयाने ठेकेदार बदलण्याचा निर्णय घेतला, निधी मंजूर झाला आणि कामाला पुन्हा गती मिळाली. माझं राजकारण हे केवळ भाषणाचं नाही, परिणामांचं आहे, असे ते म्हणाले.

### लोकांसाठी रस्ता, राजकारणासाठी नाही

खा. लंके म्हणाले, हा राजकीय विषय नाही तर लोकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. हा रस्ता कोणाच्या बॅनरवर नको, तर तो लोकांच्या पावलांखाली असावा. मी श्रेयासाठी नव्हे तर जबाबदारी म्हणून काम करतो. नगर-मनमाड महामार्गाचं काम पूर्ण होईपर्यंत मी मागे हटणार नाही.

### रस्ता की राजकारण ?

नगर-मनमाड महामार्गाचा संघर्ष आता फक्त पायाभूत सुविधेपुरता राहिलेला नाही तर तो राजकीय प्रतिष्ठेचा मुद्दा बनला आहे. मा. खा. विखेंनी केलेल्या टीकेला खा. लंके यांनी पुराव्यांसह उत्तर दिले आहे. आता प्रवाशांचे लक्ष रस्त्याच्या कामाच्या गतीवर आणि नेत्यांच्या वक्तव्यांपेक्षा प्रत्यक्ष बदलांवर आहे. या रस्त्याचे काम लवकरात लवकर पुर्ण झालं, तर हा रस्ता केवळ वाहतुकीचा मार्ग नव्हे, तर लंके यांच्या कृतीप्रधान राजकारणाचा पुरावा ठरेल, आणि विखे-लंके संघर्षाचं पुढचं पान पुन्हा लोकांच्या न्यायालयात लिहिलं जाईल.

# प्रवीण रसाळसह १० जणांची निर्दोष मुक्तता

**'हॉटेल मंथन' मधील हल्ल्याप्रकरणी न्यायालयाचा निकाल | प्रॉसिक्युशनला गुन्हा सिद्ध करण्यात अपयश | पुराव्यात विसंगतींमुळे न्यायालयाचा निर्णय**



अहिल्यानगर : प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील निघोज येथील 'हॉटेल मंथन' येथे सन २०१४ मध्ये झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. अहमदनगर सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एम. पाटील यांनी दिलेल्या या निर्णयात, ''अभियोजन पक्ष आरोपींचा गुन्हा शंका-अतिरिक्त प्रमाणावर सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे,'' असे नमूद केले आहे.

दिनांक ४ जुलै २०१४ रोजी सायंकाळी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ झालेल्या वादानंतर रात्री 'हॉटेल मंथन' येथे सुनील पवारवर शस्त्रांसह हल्ला झाल्याचा आरोप आरोपींवर ठेवण्यात आला होता. या प्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

या खटल्यात विकास रसाळ, प्रविण रसाळ, पाशा उर्फ प्रशांत बर्डे, भैय्या उर्फ ऋषिकेश भोसले यांच्यासह एकूण दहा आरोपींवर भारतीय दंडसंहितेच्या कलम १४३, १४७, १४८, ३०७, ३२३, १०९, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि शस्त्रास्त्र कायदा कलम ३/२५, ४/२५ अंतर्गत आरोप ठेवण्यात आले होते. उर्वरीत पान ३ वर

# तिघांचा जीव घेणारा नरभक्षक बिबट्या अखेर ठार!

**| वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न**
**| तीन राऊंड फायर अन् बिबट्या यमसदनी**





शिरूर : प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे अखेर नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात वनविभागाला यश आले. रात्री उशिरा गावामध्ये बिबट्याचा शोध घेत असताना वनविभागाला हा बिबट्या ड्रोनमध्ये दिसला. त्यानंतर या बिबट्याला पकडण्यासाठी डार्ट मारण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र डार्ट लक्ष्यावर न लागल्याने चुकला. यामुळे सावध झालेल्या बिबट्याने थेट वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवर प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला. अखेरीस दोन शार्प शूटरांनी या बिबट्यावर तीन राऊंड फायर केले, यात बिबट्या ठार झाला. उर्वरीत पान ३ वर

# राळेगणसिध्दीत एटीएम फोडले

**रक्कम घेऊन चोरटे पसार**



राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

राळेगणसिध्दी येथील बँक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम बुधवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात सहा चोरटयांची फोडून त्यातील रोख रक्कम लंपास केली. याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार टाटा कंपनीच्या हॅरीअर कारमधून सहा चोरटे बँक ऑफ महाराष्ट्रच्या उर्वरीत पान ३ वर



# चंदेरी

## ऐश्वर्याने नववीत असतानाच सुरू केले मॉडेलिंग!



### मिस वर्ल्ड होण्यापूर्वी मिळाला पहिला चित्रपट...

**आपल्या सौंदर्य आणि अभिनयाने बॉलिवूड आणि जगभरातील सर्वांच्या मनावर राज्य करणारी ऐश्वर्या राय- बच्चन यांनी १ नोव्हेंबरला ५२ वा वाढदिवस साजरा केला. जेव्हा जेव्हा तिचे नाव येते, तेव्हा लोकांना तिचे ग्लॅमर, सौंदर्य आणि साधेपणा आठवतो. ऐश्वर्याने तिच्या कारकिर्दीत जी उंची गाठली आहे, ती एखाद्या स्वप्नापेक्षा कमी नाही. खूप कमी लोकांना माहिती आहे, की जर ऐश्वर्याला मिस वर्ल्डचा किताब मिळाला नसता तर तिचा पहिला चित्रपट राजा हिंदुस्तानी असता... तथापि, नशिबाने वेगळा मार्ग निवडला आणि तिचा पहिला चित्रपट 'प्यार हो गया' बनला. ही कथा तिच्या अनोख्या कारकिर्दीच्या प्रवासाच्या सुरुवातीचा एक छोटासा भाग आहे...**

ऐश्वर्या रायचा जन्म १ नोव्हेंबर १९७३ रोजी कर्नाटकातील मंगलोर येथे झाला. ती एका सामान्य कुटुंबात वाढली, परंतु लहानपणापासूनच तिला अभ्यास आणि कला यात रस निर्माण झाला. ऐश्वर्याला विज्ञान आणि प्राणीशास्त्राची आवड होती आणि तिला डॉक्टर बनण्याची आकांक्षा होती. नंतर तिचा मार्ग बदलला आणि तिने मुंबईत आर्किटेक्चरचा अभ्यास सुरू केला. अभ्याससोबतच तिने मॉडेलिंगच्या जगात प्रवेश केला आणि हे तिचे पहिले मोठे पाऊल होते, ज्याने तिला ग्लॅमरकडे आकर्षित केले.



### करिअरचा एक महत्त्वाचा टप्पा

ऐश्वर्या नववीत असताना कॅमेलिनसाठी मॉडेलिंगला सुरुवात केली. त्यानंतर ती पेप्सी, फ्रूटी आणि इतर अनेक प्रमुख ब्रँडच्या जाहिरातींमध्ये दिसली. या जाहिरातींमुळे तिला लोकप्रियता मिळाली आणि लोक तिचा चेहरा ओळखू लागले. मॉडेलिंगमध्ये काम करत असतानाच तिने सौंदर्य स्पर्धांच्या जगात प्रवेश केला. १९९४ मध्ये मिस इंडिया रनर-अप झाल्यानंतर तिने मिस वर्ल्डचा किताब जिंकून इतिहास रचला. हा विजय तिच्या कारकिर्दीत एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

### राजा हिंदुस्तानी ठरला असता पहिला चित्रपट

ऐश्वर्याची चित्रपटसृष्टीतील कारकिर्द थोडी वेगळी सुरू झाली. एका मुलाखतीत तिने स्वतः सांगितले होते की जर ती मिस वर्ल्ड झाली नसती तर तिचा पहिला चित्रपट 'राजा हिंदुस्तानी' असता. पण तिचा पहिला चित्रपट १९९७ मध्ये 'प्यार हो गया' होता. या चित्रपटाने तिला बॉलिवूडमध्ये ओळख मिळवून दिली आणि प्रेक्षकांनी तिच्या अभिनयाचे कौतुक केले. त्यानंतर तिने सतत काम केले आणि चित्रपटांमध्ये तिचे स्थान निर्माण केले. तिच्या काही संस्मरणीय चित्रपटांमध्ये 'हम दिल दे चुके सनम', 'खाकी', 'देवदास', 'धूम २', 'मोहब्बतें', 'जोधा अकबर', 'ताल' आणि 'गुरु' यांचा समावेश आहे. ऐश्वर्याने केवळ बॉलिवूडमध्येच नाही तर हॉलिवूड चित्रपटांमध्येही काम केले आहे, ज्यात 'द पिंक पँथर २', 'प्रोव्होक्ड', 'मिस्ट्रेस ऑफ स्पाइसेस' आणि 'ब्राइड अँड प्रिज्युडिस' यांचा समावेश आहे. २००३ मध्ये ऐश्वर्या राय कान्स फिल्म फेस्टिव्हल ज्युरी असलेली पहिली भारतीय अभिनेत्री बनली. तिला २००९ मध्ये 'पद्मश्री' आणि २०१२ मध्ये फ्रेंच 'ऑर्डर ऑफ आर्ट्स अँड लेटर्स' पुरस्कारदेखील मिळाला.

### अभिषेक बच्चनपेक्षाही जास्त श्रीमंत

ऐश्वर्या रायचं वार्षिक उत्पन्न कमी चित्रपटांत काम करूनही नवरा अभिषेक बच्चनपेक्षाही जास्त आहे. ती बॉलीवूडमधील श्रीमंत अभिनेत्रींपैकी एक आहे. चित्रपटांव्यतिरिक्त ती लॉरिअल पॅरिससारख्या ब्रँडमधून कोट्यवधींची कमाई करते. यामुळेच कमी चित्रपटांत काम करूनही तिची नेटवर्थ जास्त आहे. अहवालानुसार ऐश्वर्या रायचे वार्षिक उत्पन्न ८६२ कोटी इतके आहे. अभिषेक बच्चनचं उत्पन्न २५० कोटी आहे, तर ऐश्वर्याचे ८६२ कोटी. तिचा देशाबाहेरही चाहतावर्ग आहे.

**विशेष मुलाखत** प्रश्न : तुम्ही आधी खूप स्पष्टवक्ते, धाडसी होतात..?

## आता मी शहाणा झालो, आयुष्य बदलले : नवाजुद्दीन

**अनुभवी अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी पात्रांना आपला नायक मानतो. त्याची संघर्ष यात्रा जितकी अनोखी राहिली, तितकाच भूमिकांचाही आलेख अद्भूत आहे. आजकाल, तो त्याच्या नवीन चित्रपट 'थामा'मुळे चर्चेत आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींचा गल्ला ओलांडला आहे. यानिमित्ताने त्याच्याशी केलेली खास बातचीत...**

**प्रश्न : नवाज, तू नेहमीच खूप स्पष्टवक्ता आणि धाडसी राहिला आहेस, मग तुला कधी त्याचे परिणाम भोगावे लागले आहेत का ?**

» **नवाजुद्दीन :** हो, तेव्हा मी खूप मूर्ख होतो, पण आता खूप शहाणा झालो आहे. शहाणा झाल्यापासून माझे आयुष्य बदलले आहे. (हसतो) आता मी अधिक विचारपूर्वक बोलतो.



**प्रश्न : तुम्ही दीर्घकाळ छोट्या छोट्या भूमिका केल्या. कधी अशी भीती वाटली का, की साईड ॲक्टर म्हणूनच ना राहो ?**

» **नवाजुद्दीन :** खरं सांगायचं तर, जेव्हा मी बॉलीवूड इंडस्ट्रीत प्रवेश केला तेव्हा वाटलं नव्हतं की मला मोठा अभिनेता होता येईल. मला अभिनय करायचा होता, मग तो थिएटर असो किंवा पथनाट्य. अगदी कुणाच्या छोट्या मोठ्या कार्यक्रमातही मला अभिनय करायची संधी मिळाली असती तरी मी केली असती. मी अभिनयापलीकडे काहीही विचार केला नाही, करतही नाही. मला जे काही मिळाले आहे ते एक बोनस आहे आणि त्यासाठी मी देवाचे आणि सर्वांचे खूप खूप आभार मानू इच्छितो.

**प्रश्न : तू स्टार सिस्टम तोडलीस आणि तुझ्यासाठी टेलर मेड भूमिका लिहिल्या जाऊ लागल्या. तुला काय म्हणायचे आहे ?**

» **नवाजुद्दीन :** मला वाटते की तुमच्यासाठी कितीही मोठी भूमिका लिहिली गेली तरी, जर तुमच्याकडे त्यासाठी कला आणि तयारी नसेल तर ती फक्त एक भूमिकाच राहील. एखाद्या अभिनेत्यासाठी चांगले असणे महत्वाचे आहे. प्रयत्नाने ध्येय सोपे होईल. पण माझ्या मते, पात्र हे नायक असले पाहिजे. मला वाटते की प्रत्येक कथेला सांगण्याची वेळ असते आणि जेव्हा ती कथा त्या पात्रासोबत सांगितली जाते तेव्हा त्यापेक्षा चांगले काहीही नाही. मी नेहमीच माझ्या पात्रांना महत्त्व दिले आहे.

**प्रश्न : तुमचा संघर्षाने भरलेला प्रवास असंख्य लोकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. तुमच्यासाठी सर्वात कठीण काळ कोणता होता ?**

» **नवाजुद्दीन :** संघर्ष हा प्रत्येकाच्या आयुष्याचा एक भाग आहे. मी कोणी खास नाही. माझ्या आधीच्या लोकांनी



कठीण संघर्षाचा अनुभव घेतला आहे, पण सर्वात मोठे आव्हान म्हणजे जेव्हा तुम्हाला तुमच्या मेहनतीनुसार जे पात्र आहे ते मिळत नाही. तुम्हाला तुमचे काम माहित आहे, तुम्ही खूप सराव केला आहे, परंतु जोपर्यंत तुम्हाला त्या दर्जाचे काम मिळत नाही तोपर्यंत ते कठीण असते. त्यामुळे तुम्हाला चिकाटीने काम करत राहावे लागते. सततच्या मेहनतीनंतर मी या टप्प्यावर पोहोचलो याबद्दल मी कृतज्ञ आहे. पण चिकाटीने काम केल्यानंतरही अनेकदा कठोर परिश्रमाचे फळ मिळत नाही.

**प्रश्न : तुमची मुलगी तुमचा चित्रपट 'थामा' पाहू शकली म्हणून तुम्ही आनंद दिसत आहात... नाहीतर, तुमचं म्हणणं होतं, की इंटेंस भूमिकांमुळे तुमचे कुटुंब तुमचे चित्रपट पाहू शकत नव्हते...**

» **नवाजुद्दीन :** माझ्या मुलांनी अखेर माझा चित्रपट पाहिला ही खूप आनंदाची गोष्ट आहे. शोराला (नवाजची मुलगी) हा चित्रपट खूप आवडला. तिला माझे काम खूप आवडले. शोरा स्वतः स्वतःचे निर्णय घेते. मला वाटलं होतं की ती दुसरं क्षेत्र निवडेल, पण तिने अभिनय निवडला. ती माझं अजिबात ऐकत नाही. आता मी काय करू? (मोठ्याने हसतो.)

**प्रश्न : एक काळ असा होता जेव्हा हॉरर शैलीकडे कोणत्याही प्रतिष्ठेने पाहिले जात नव्हते, पण आता, हॉररची व्याख्या हॉरर-कॉमेडी म्हणून पुन्हा केली गेली आहे का ?**

» **नवाजुद्दीन :** पूर्वी हॉररला सावत्र आईसारखे वागवले जात होते, पण आजकाल, सर्वोत्तम कलाकार देखील या शैलीत काम करू इच्छितात. कारण ते खूप मनोरंजक आहे. पूर्वी, फक्त भीतीवर लक्ष केंद्रित केले जात होते, परंतु आता त्यात विनोद, प्रणय आणि नाटक देखील समाविष्ट आहे. आमचा चित्रपट असेच एक उदाहरण आहे. हॉरर चित्रपट फक्त भीतीच्या भावनेवर केंद्रित असायचा, पण थमा पाहिल्यानंतर मला जाणवलं की कलाकारांना अनेक संधी आहेत.

## मिलिंद शिंदे यांची भन्नाट प्रेमकहाणी !

**मिलिंद शिंदे मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेते आहेत. त्यांनी आजवर विविध माध्यमांमध्ये काम करत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. सध्या ते 'देवमाणूस' मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिका साकारत आहेत. अशातच त्यांनी त्यांच्या खासगी आयुष्याबद्दल आणि प्रेमकहाणीबद्दल सांगितलं आहे. त्यांनी नुकतीच 'दूरदर्शन सह्याद्री'ला सहपत्नीक मुलाखत दिली आहे. यात त्यांनी त्यांच्या प्रेमकहाणीबद्दल सांगितलंय. त्यांच्या लग्नाला त्यांच्या सासुबाईंचा सुरुवातीला विरोध असल्याचं त्यांनी यामध्ये म्हटलं आहे.**

मिलिंद यांच्या पत्नी प्राजक्ता शिंदे यांनी त्यांची ओळख फेसबुकमार्फत झाल्याचं म्हटलं आहे. त्या म्हणाल्या, की फेसबुकवर ओळख झाली. मी त्याला रिक्वेस्ट पाठवली होती, त्यांनी ती अक्सेप्ट केली. त्यानंतर आमच्यात गप्पा सुरू झाल्या. माझा एक मित्र आहे, तो इव्हेंट ऑर्गनाइज करतो आणि त्यानिमित्तच आमची पहिली भेट झाली. मग एकमेकांचे नंबर घेतले आणि बोलणं सुरू झालं. प्राजक्ता पुढे म्हणाल्या, की आम्ही खूप वेगवेगळ्या गोष्टींबद्दल बोलायचो. पण मला असं कधीच वाटलं नव्हतं की हा मला प्रपोज करेल आणि अचानक एका रात्री फोन आला आणि मला म्हणाला एकत्र राहायला सुरुवात करुयात; तेव्हा मला धक्का बसला. मी थोडा विचार केला, पहिल्यांदा नाही म्हटलं. पण, नंतर आम्ही भेटलो तेव्हा मला जाणवलं की हा थोडा वेगळा आहे आणि मग प्रेमकहाणी सुरू झाली, असे त्यांनी सांगितलं. तुमच्या लग्नाला विरोध झाला नाही का असं विचारल्यानंतर प्राजक्ता म्हणाल्या, की विरोध झाला. याबद्दल मिलिंद शिंदे यांनी सांगितले, की हिच्या आईने मला विचारलं, तुम्ही असं मालिकेत बायकांना मारता वगैरे, खऱ्या आयुष्यात आमच्या मुलीबरोबर केलं तर काय करायचं. पण भूमिकेमुळे माझी इमेजच तशी झालेली. मी त्यांना म्हटलं, तुम्हाला ५-६ महिन्यात कळेल.

### माणूस आवडला...

**प्राजक्ता म्हणाल्या, की मी त्यांच्यातला माणूस पाहिला, मला तो आवडला आणि मग मी घरी सांगितलं की मला तो आवडतो म्हणून. त्यानंतर वडिलांनी सांगितलं, ठीक आहे, बोलाव त्यांना. मग हा माझ्या घरी आला, मागणी घातली. आता मिलिंद शिंदे व प्राजक्ता शिंदे यांच्या लग्नाला अडीच वर्षे झाल्याचं त्यांनी मुलाखतीत म्हटलं आहे.**

## एक चूक अन् संपलेलं करिअर...

**भूल भुलैया चित्रपटात सिद्धार्थ चतुर्वेदीच्या भूमिकेतील अभिनेता आठवतो का ? 'गँगस्टर'सह अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये या अभिनेत्याने काम केलं. पण बलात्काराच्या प्रकरणात अडकला आणि त्याचं फिल्मी करिअर संपलं. या अभिनेत्याचं नाव शायनी आहुजा होय. शायनी आहुजा आता कुठे राहतो, काय करतो ? याबद्दल माहिती समोर आली आहे.**

शायनीचे वडील भारतीय लष्करात कर्नल होते आणि आई गृहिणी होती. शायनी दिल्लीत वाढला आणि बंगळुरूमधून त्याने इंजिनिअरींगचं शिक्षण घेतलं. थिएटर दिग्दर्शक बॅरी जॉनला भेटल्यानंतर त्याने थिएटर करायचं ठरवलं. नंतर शायनी जाहिरातींमध्ये काम करू लागला. लवकरच तो जाहिरात क्षेत्रातील एक लोकप्रिय चेहरा बनला. कॅडबरी आणि सिटीबँकसारख्या अनेक टॉप ब्रँडच्या जाहिरातीत त्याने काम केलं. निर्माते सुधीर मिश्रा यांनी शायनीला पेप्सीच्या जाहिरातीत पाहिलं आणि तिथून त्याचा बॉलीवूडमधील प्रवास सुरू झाला. सुधीर मिश्रांनी त्याला 'हजारों ख्वाहिशे ऐसी' मध्ये मुख्य भूमिकेत घेतलं. या चित्रपटात शायनीबरोबर के. के. मेनन, चित्रांगदा सिंह आणि सौरभ शुक्ला होते. शायनीने त्याच्या पदार्पणाच्या वर्षात एक नाही तर चार चित्रपट केले. पण त्याला खरी ओळख 'गँगस्टर'मधून मिळाली. 'गँगस्टर'मधून कंगना राणावतने बॉलीवूड पदार्पण केलं होतं. 'गँगस्टर' बॉक्स ऑफिसवर हिट ठरला आणि शायनीला आणखी चित्रपट मिळाले. त्याने 'वो लम्हे', 'लाइफ इन अ... मेट्रो', आणि 'भूल भुलैया'सारखे सिनेमे केले.

२००९ मध्ये शायनी आहुजा बातम्यांमध्ये आला. त्याचं कारण म्हणजे त्याच्यावर झालेले गंभीर आरोप. घरी काम करणाऱ्या १९ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करणे, तिला ताब्यात ठेवणे आणि धमकी देणे या आरोपाखाली शायनीला अटक झाली आणि त्याच्या करिअरला ब्रेक लागला. काही महिन्यांनंतर त्याला दिल्ली न सोडण्याच्या अटीवर जामीन मंजूर करण्यात आला. तक्रारदार तरुणीने नंतर तिचा जबाब मागे घेतला. पण २०११ मध्ये, मुंबईतील एका जलदगती न्यायालयाने आहुजाला बलात्काराच्या गुन्ह्यात दोषी ठरवलं आणि त्याला सात वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. वैद्यकीय अहवाल, डीएनए पुरावे आणि पीडितेच्या सुरुवातीच्या जबाबावर आधारित ही शिक्षा सुनावण्यात आली होती. पण शायनीने मुंबई उच्च न्यायालयात या आदेशाविरुद्ध अपील केले आणि त्याची अपील स्वीकारण्यात आली आणि नंतर त्याला जामीन मंजूर करण्यात आला होता. शायनी आहुजाने बॉलीवूडमध्ये कमबॅक करायचा प्रयत्न केला. २०१५ मध्ये अनीस बझमीच्या 'वेलकम बॅक' या चित्रपटात तो झळकला. हा चित्रपट हिट झाला, पण त्याचा शायनीला फार फायदा झाला नाही. हा हिंदी चित्रपटसृष्टीतील त्याचा शेवटचा चित्रपट ठरला.

### आता काय करतो ?

मुंबई उच्च न्यायालयाने २०२३ मध्ये शायनी आहुजाला १० वर्षांसाठी त्याचा पासपोर्ट रिन्यू करण्याची परवानगी दिली. नुकतीच एक्सवर एक पोस्ट व्हायरल झाली आहे. त्यानुसार शायनी आहुजा आता फिलीपिन्समध्ये स्थायिक झाला आहे आणि तिथे कपड्यांचा व्यवसाय करत आहे.



## यामी गौतमला व्हायचं होतं आयएएस...

**अभिनेत्री यामी गौतमने २०१२ ला 'विकी डोनर' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. 'सनम रे', 'बदलापूर', 'बाला', 'गिन्नी वेड्स सनी', 'उरी : द सर्जिकल स्ट्राईक', 'ओएमजी', 'आर्टिकल ३७०', 'लॉस्ट', 'चोर निकल के भागा', 'दसवी', अशा अनेक चित्रपटांत काम केले आणि तिच्या भूमिका लोकप्रियही ठरल्या. आता अभिनेत्री लवकरच एका नवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामीच्या अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीबद्दल सर्वांनाच माहीत आहे. मात्र, अभिनेत्रीने कोणत्या क्षेत्रात शिक्षण घेतले आहे, हे तुम्हाला माहीत आहे का ? खरे तर यामीला एका वेगळ्याच क्षेत्रात करिअर करायचे होते.**

यामीचा जन्म २८ नोव्हेंबर १९८८ साली हिमाचल प्रदेशमधील बिलासपूरमध्ये झाला होता. यामी गौतमने चंदिगडमधील यादविंद्र पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतले. शालेय शिक्षणानंतर तिने पंजाब विद्यापीठात प्रवेश घेतला. काही रिपोर्टसनुसार, यामीला कॉलेजमध्ये शिकत असताना आयएएस अधिकारी व्हायचे होते. ती ऑनर्सचे शिक्षण घेत होती. यामीने एका मुलाखतीत तिची अभिनय क्षेत्रातील करिअरला कशी सुरुवात झाली याबद्दल सांगितले होते. यामी म्हणालेली, की तिच्या



घरी काही पाहुणे आले होते. यामीच्या वडिलांच्या मित्राची पत्नी अभिनेत्री होती. त्यांना वाटले की, यामी अभिनय क्षेत्रात काम करू शकते. त्यानंतर यामीचे काही फोटो मुंबईतील अनेक प्रॉडक्शन हाऊसना पाठवले गेले. वयाच्या २० व्या वर्षी यामी गौतम चित्रपटांमध्ये करिअर करण्यासाठी चंदिगडहून मुंबईला आली. त्यासाठी तिने तिचे शिक्षण अर्ध्यावरच सोडले. यामीने मॉडेलिंगपासून तिच्या कारकिर्दीची सुरुवात केली. तिने अभिनेता आयुष्मान खुरानाबरोबर 'विकी डोनर' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्याशिवाय यामीने तेलुगू, मल्याळम व कन्नड या भाषांतील चित्रपटांमध्येही काम केले आहे. यामी हक या चित्रपटातून लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हक या चित्रपटात इमरान हाश्मी प्रमुख भूमिकेत आहे. या चित्रपटात यामीबरोबर काम करण्याचा अनुभव सांगाताना इमरान हाश्मीने तिचे कौतुक केले. तो म्हणाला की, ती काही मोजक्या अभिनेत्रींपैकी एक आहे, जी वेळेवर शूटिंगसाठी येते आणि त्यामुळे तिच्याबरोबर काम करताना कोणतीही अडचण आली नाही. दरम्यान, हक हा चित्रपट ७ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपुरात महायुतीला धक्का

■ **श्रीरामपूर :** शहरात नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीला मोठा धक्का बसला आहे. भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाचे नगरसेवक, शहराध्यक्ष आणि कार्यकर्त्यांनी काँग्रेस नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यात नगरसेवक शामलिंग शिंदे, गटनेते राजेंद्र पवार, रईस जहागिरदार, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अभिजित लिप्टे, नगरसेविका प्रणिती दिपक चव्हाण, मर्चंटचे संचालक दत्तात्रय धालपे, योगेश जाधव, निलेश बोरावके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

### गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

■ **इसळक :** अहिल्यानगर तालुक्यातील इसळक शिवारात शिवाजी दत्तु खिसे यांच्या शेतात एका अनोळखी तरुणाने (वय अंदाजे ३५) लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. मयत तरुणाची ओळख पटवणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

### माजी नगरसेवका विरोधात अत्याचाराचा गुन्हा

■ **श्रीगोंदा :** नगरपालिकेचे माजी नगरसेवक सुनील भगवंत वाळके यांच्याविरोधात एका विवाहित महिलेने श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अत्याचाराची फिर्याद दाखल केली आहे. मागील नऊ वर्षांपासून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार होत असल्याचा आरोप पीडितेने केला आहे. फिर्यादीनुसार, तिचा पती २०१६ पासून वाळके यांच्या संपर्कात असून, त्याच काळात वाळके यांनी पीडितेचा विश्वास संपादन केला. फेसबुकवरील संवादातून वाळके यांनी तिला घटस्फोट देऊन सोबत राहण्याचे भावनिक व सामाजिक आमिष दाखवले, असा आरोप महिलेने केला आहे.

### बहीण-भावाचा तलावात बुडून मृत्यू

■ **राहाता :** तालुक्यातील गोगलगाव येथे सख्ख्या बहीण-भावाचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वीच याच तलावात दोन भावांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या सलग दोन घटनांमुळे गावकरी हादरले आहेत. दुपारच्या वेळी दोघे भाऊ-बहिण तलावाकडे कधी गेले हे कोणालाच कळले नाही. तिसऱ्या प्रहरी मुले न दिसल्याने घरच्यांनी त्यांचा शोध सुरू केला असता, तलावाच्या भिंतीवर त्यांच्या चपला आढळून आल्या. तलावात पावसाचे पाणी साचले होते.

### कर्जतच्या समर्थ विद्यालयाची बाजी

■ **कर्जत :**जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेच्या फेर सामन्यात कर्जतच्या समर्थ विद्यालयाने न्यू इंग्लिश स्कुल टाकळीभान (ता. श्रीरामपूर) संघावर १२ गुणांनी मात केली. हा सामना जिल्हा क्रीडा संकुल अहिल्यानगर येथे पार पडला. यापूर्वीही कर्जतने अंतिम फेरीत टाकळीभानवर विजय मिळवला होता.

# मी मास्टर माईंड नाहीच, फलटणची बदनामी थांबवा

**| रणजितसिंह निंबाळकरांच्या आरोपांवर रामराजेंचे प्रत्युत्तर**
**| माजी डीवायएसपी धसांच्या चौकशीचीही केली मागणी**



**सातारा : प्रतिनिधी**

**फलटण येथील डॉ संपदा आत्महत्या प्रकरणानंतर सुरू झालेल्या आरोपांच्या फैरींनी फलटण तालुक्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. या प्रकरणात माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी अप्रत्यक्षपणे मास्टरमाइंड म्हणून केलेल्या उल्लेखाला विधानपरिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी पत्रकार परिषदेत सडेतोड उत्तर दिले. मी कोणताही मास्टरमाइंड नाही, माझी आणि फलटण तालुक्याची बदनामी थांबवा, असे ठणकावतानाच रामराजे यांनी तत्कालीन डीवायएसपी राहुल धस यांच्या कार्यकाळाची एसआयटी चौकशी करण्याची जोरदार मागणी केली आहे.**

**मास्टरमाइंडच्या आरोपांना प्रत्युत्तर**

रामराजे यांनी सुरुवातीलाच मास्टरमाइंड हा आरोप फेटाळून लावला. ते म्हणाले, माझ्यावर आरोप केला जातो की मी मास्टरमाइंड आहे. देवेंद्र फडणवीस यांची सभा रद्द व्हावी, यासाठी मी हे केल्याचे म्हटले जाते. पण असले उद्योग आम्ही करत नाही. ज्या हॉटेलमध्ये ही घटना घडली, त्याचाही मास्टरमाइंड मीच आहे का? या जिल्ह्यात पोलिसांना एका विशिष्ट व्यक्तीकडून डायरेक्शन (निर्देश) जातात आणि त्याप्रमाणे सर्व गोष्टी घडतात, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

**माजी डीवायएसपी धस यांच्या एसआयटी चौकशीची मागणी**

या प्रकरणातील मुख्य मुद्दा मांडताना रामराजे यांनी तत्कालीन डीवायएसपी राहुल धस यांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पीडित महिला डॉक्टर यांनी फलटण ग्रामीण पोलिसांविरुद्ध त्यांच्या डिपार्टमेंटकडे तक्रार केली होती. मात्र, डीवायएसपी धस यांनी ती तक्रार दाबून टाकली, अशी माझी माहिती आहे, असा गौप्यस्फोट रामराजे यांनी केला. माझी राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे स्पष्ट मागणी आहे की, जशी या मुलीच्या मृत्यूची एसआयटी लावली आहे, तशीच डीवायएसपी धस यांच्या कारभाराचीही वेगळी एसआयटी लावली पाहिजे.

**२७७ केसेस आणि हायकोर्टात जाण्याचा इशारा**

धस यांच्या कार्यकाळावर गंभीर आरोप करताना रामराजे म्हणाले, धस यांच्या काळात वाळूचे किंवा इतर नंबर दोनचे धंदे करणाऱ्यांकडून हप्ते घेतले गेले नाहीत, असा एकही व्यक्ती नाही. याच काळात २७७ केसेस दाखल झाल्या. आमची माहिती अशी आहे की, एकाच फॉरमॅटमध्ये फक्त नावे बदलून या केसेस दाखल केल्या गेल्या. या सर्व २७७ केसेस आपण वकिलांचा सल्ला घेऊन हायकोर्टात नेणार असून, त्याच्या एसआयटी चौकशीची मागणी करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

**विरोधकांवरही साधला निशाणा**

रामराजे यांनी माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्यावरही टीका केली. आगवणे नावाच्या व्यक्तीचा उल्लेख करत, हा आगवणे १४ आणि १९ साली भाजपचा जर कार्यकर्ता होता. त्याला व्हिडिओ काढून हे रामराजेंनी करायला लावले असे सांगण्यासाठी भाग पाडले गेले, असा आरोप त्यांनी केला.

२०२२ सालच्या एका घटनेचा उल्लेख करत ते म्हणाले, मला किडनॅपिंग आणि खंडणीच्या खोट्या केसमध्ये अडकवण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळी मी देवेंद्र फडणवीस यांना फोन केला. त्यांनी पुणे कमिशनरला सांगून राजकीय माणसाला धक्का लागता कामा नये असे बजावले आणि तो विषय थांबला. मग आता सांगा, खरा मास्टरमाइंड कोण आहे?.रामराजे यांनी स्पष्ट केले की, त्यांचा लढा हा भाजप पक्षाविरुद्ध नसून, सत्तेचा गैरवापर करणाऱ्या विकृत मनोवृत्तीविरुद्ध आहे. या सर्व प्रकारांमुळे फलटण तालुक्याची बदनामी होत असून, आपण केवळ विकासाचे राजकारण करत आलो आहोत, असेही त्यांनी नमूद केले.

**दुग्धाभिषेक व रडण्याचे नाटक रणजितसिंह निंबाळकर यांनी केले - संजीव राजे निंबाळकर**

फलटणला काल नाटकाचा एक अंक झाला. त्यामध्ये दुधाने अभिषेक आणि रडण्याचे नाटक झाले. त्यांचा तो अभिनय 'ऑस्कर' देण्यासारखा होता'', अशी मिश्किल टीका सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी केली.

महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरुन रोज नवीन राजकीय आरोप होत असताना माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी दि. ३ रोजी फलटणच्या गजानन चौकात जाहीर पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेमध्ये त्यांच्यावर होणार्या आरोपांमागे विधान परिषदेचे माजी सभापती आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर असल्याचा जाहीर आरोप रणजितसिंह यांनी केला होता. त्याला उत्तर देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत संजीवराजे नाईक निंबाळकर बोलत होते. यावेळी आ. रामराजे नाईक निंबाळकर, अनिकेतराजे नाईक निंबाळकर उपस्थित होते.संजीवराजे म्हणाले, महिला डॉक्टरांचे घडलेले प्रकरण दुर्दैवी आहे. त्यावरुन सुरु असलेले आरोप - प्रत्यारोपही दुर्दैवी आहेत. हे प्रकरण झाल्यानंतर सगळ्यात पहिल्यांदा रामराजेंनीच पत्रकार परिषद घेतली होती. त्यामध्ये त्यांनी केवळ सखोल चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर सदर महिला डॉक्टरांचे काही लेखी खुलासे माध्यमांनी समोर आणले. त्यानंतर माजी खासदारांवर आरोप सुरु झाले. ते पत्रकारांनी बाहेर काढले आणि ते आता रामराजेंना यासाठी जबाबदार धरत आहेत.

**वाचकांच्या लेखणीतून**

# आजन्म रेल्वे पास!



**काकासाहेब कालेलकर (१८८५-१९८१) यांना प्रवासी साहित्यिक म्हटले जाते. त्यांना प्रवासाची फार आवड होती. ते म्हणत, साहित्यसेवा करण्यापेक्षा समाजसेवा करणे अधिक महत्त्वाचे असल्यामुळे माझ्या हातून साहित्यसेवा बेताचीच होते. मला त्याचा विषाद नाही. पण आनायासे देशदर्शन, प्रकृति-निरीक्षण, सौंदर्यचिंतन घडते व ते केव्हा लेखांच्या रूपाने लिहून होते. त्यांनी हिंदुस्थानातील काही धार्मिक आणि प्रेक्षणीय स्थळांचा प्रवास केलाच होता. हिमालयाचाही प्रवास केला होता. अफ्रिका, जपान या परराष्ट्रांचाही प्रवास केला होता. त्यांवर त्यांनी हिमालयनो प्रवास (१९२४), ब्रह्मदेशनो प्रवास (१९३१), पूर्व अफ्रिकामां (१९५१), उगमणो देश : जापान (१९५८) हे गुजराती ग्रंथ लिहिले आहेत. त्यांतले काही मराठीतही वाचायला मिळतात. काकासाहेब कालेलकरांचे एक स्नेही, अहमदाबादच्या झेवियर्स महाविद्यालयातील विद्वान गणितज्ञ फादर वॉलेस यांनी अभिप्राय दिला आहे. भारताचा परिचय, भूगोल, पाठ्यपुस्तके, मानचित्रे (नकाशे) व थोडाफार प्रवास झाला होता, पण नद्यांचा स्नेह, हिमालयाची साधना, भटकंतीचा आनंद हे सारे काकासाहेबांच्या प्रवास वर्णनानेच दिले. ( काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य, मृणालिनी जोगळेकर, पृ.९७). काकासाहेबांचे लेखनिक आणि मराठी साहित्यिक श्रीपाद जोशी म्हणतात, बहुभाषा कोविद, रसिक आणि सखोल चिंतक म्हणून काकासाहेबांना सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. (श्रीपाद जोशी). त्यावरून काकासाहेबाच्या प्रवासाची आवड आणि प्रवासवर्णनांचा दर्जा तथा वाचनीयता आपल्या ध्यानात येते. चरैवेति चरैवेति (चालत रहा. चालत रहा) असा वेदमंत्रच आहे. म्हणून काकासाहेब म्हणतात, चालणाऱ्याचे डोकेही भरधाव चालू लागते, मात्र त्याला एकाच दिशेने चालण्याचे बंधन नसते.**

**जिथे धबधबे असतात तिथे कशी कोण जाणे, पण वेगवेगळी पाखरे असतातच. हे व्दिजगण निसर्गाकडून धबधब्याचे व्याकरण शिकतात. इजिप्तच्या नील नदीला काकासाहेब नीलाम्बा म्हणतात.**

**१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर भारत सरकारकडून त्यांना मोठमोठी हुद्द्याची पदे मिळाली असती. त्यांनी ती नाकारली. फारच आग्रह झाल्यावर त्यांनी भारत सरकारकडून भारतभर प्रवास करण्यासाठी आजन्म रेल्वे पास मागून घेतला. त्यांच्या मृत्यूपर्यंत तो पास त्यांच्याजवळ होता!**

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

## मविआ-मनसे दुबार मतदानावरुन आक्रमक

**निवडणूक आयोगाने तोडगा काढला | स्टार मार्ग शोधला**





**मुंबई: प्रतिनिधी**

**राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली जात आहे. राज्यातील अनेक महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, नगर पंचायतींमध्ये सध्या प्रशासनाच्या ताब्यात आहेत. आधी करोना आणि मग आरक्षणाचा प्रश्न यामुळे निवडणुका रखडल्या. त्या ३१ जानेवारी २०२६च्या आधी घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज माध्यमांना संबोधित केले.**

राज्यातील २४६ नगर पंचायती, ४२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. त्याची प्रिंट आउट काढून निवडणूक अधिकाऱ्यांना द्यावी लागेल. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंतची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. १ कोटी ७ लाख मतदार या निवडणुकीत मतदान करतील. त्यांच्यासाठी १३,३५५ मतदान केंद्रं असतील. ईव्हीएमवरच निवडणूक होणार आहे. नवीन मोबाईल ऍपच्या मदतीने मतदारांना मतदान केंद्र आणि मतदार यादीतील नाव शोधता येईल. त्यात उमेदवारांबाबत सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली.

टूल विकसित करून संभाव्य दुबार मतदारांच्या नावासमोर दोन स्टार असतील. त्याची चौकशी निवडणूक अधिकारी करतील आणि तो कुठे मतदान करणार याची आधीच माहिती घेतली जाईल. जे मतदार याला प्रतिसाद देणार नाहीत ते मतदान करण्यास आल्यास त्यांच्याकडून डिक्लेरेशन भरून घेतले जातील, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

निवडणुकीतील दुबार मतदानाचा मुद्दा विरोधी पक्षात असलेल्या महाविकास आघाडी आणि मनसे यांच्याकडून सातत्यानं मांडला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने खबरदारीचा उपाय शोधला आहे.

# ...अन् वेटरचा मुलगा झाला सीए !

**| आर्थिक अडचणींवर मात करत राजेश चौधरी अंतिम परीक्षा उत्तीर्ण**
**| आठ वर्षांच्या खडतर प्रवासाला यश**

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**'जो परिस्थितीपेक्षा स्वप्नांना मोठं मानतो, त्याच्याकडे जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन असेल, तर यश नक्कीच मिळते' हे वाक्य अक्षरशः खरं ठरवलं आहे राजेश विश्वजीत चौधरी या तरूणाने. बिकट आर्थिक परिस्थिती, मर्यादित साधने आणि अडचणींचा डोंगर पार करत राजेशने चार्टर्ड अकाउंटंट होण्याचे स्वप्न अखेर सत्यात उतरवले आहे.**



राजेशचे वडील विश्वजीत चौधरी हे शहरातील एका हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करतात. त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नातून घरखर्च चालवणे अवघड होते. मात्र या परिस्थितीवर मात करण्याची जिद्द राजेशच्या डोळ्यांत होती. सन २०१७ मध्ये दहावीच्या परीक्षेत त्याने ९६.२० टक्के गुण मिळवले. पण सीए व्हायचे ठरवल्यावर पुढे काय करायचे, कुठून सुरुवात करायची, याबद्दल त्याला माहिती नव्हती.

अशा वेळी देसरडा भंडारी ॲकॅडमीचे संस्थापक संदीप देसरडा हे पुढे आले. राजेशच्या घरच्या परिस्थितीची जाण घेऊन त्यांनी त्याला थेट प्रवेश प्रक्रियेच्याच शेवटच्या दिवशी त्याची सीए फाउंडेशनसाठी नोंदणी फीही स्वतः भरत त्यांनी राजेशच्या स्वप्नांना उंच भरारी घेण्यासाठी पंख दिले. राजेशने रेसिडेन्शियल कॉलेजमधून उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. देसरडा यांच्या ॲकॅडमीतून फाउंडेशन परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली. त्यानंतर सन २०२१ मध्ये इंटरमिजिएटच्या दोन्ही गटांमध्येही यश मिळवले. पुढे भंडारी सरांकडे आर्टिकलशीप करताना त्याने अनुभव आणि आत्मविश्वास दोन्ही कमावले. औद्योगिक प्रशिक्षणासाठी तो दिल्लीला गेला आणि तिथे विविध संस्थांमध्ये काम केले. जिद्द आणि चिकाटीचा मार्ग निवडत त्याने मे व सप्टेंबर २०२५ मधील प्रयत्नांत अखेर सीए अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली आहे. या यशामुळे राजेशने आपल्या वडिलांचे स्वप्न, आपली मेहनत आणि गुरुजनांचा विश्वास सार्थ ठरवला आहे.

अभिमानाची बाब

सात वर्षांपूर्वी दहावी परीक्षेतील यश व राजेशची जिद्द पाहूनच त्याला प्रोत्साहन द्यायचे ठरवले. त्याने तो विश्वास सार्थ ठरवत आज सीए होऊन उभा राहिला आहे. एका विद्यार्थ्याच्या पंखात बळ दिल्यानंतर त्याने घेतलेली यशस्वी झेप ही अभिमानाची बाब आहे.

संदीप देसरडा
देसरडा भंडारी ॲकॅडमी, अहिल्यानगर.

विश्वासाने बळ दिले

दहावीनंतर लोकवर्गणीतून मिळालेली मदत आणि संदीप देसरडा सरांनी दाखवलेला विश्वास माझ्यासाठी बळ देणारा ठरला. आज सीए होण्याचं स्वप्न साकार झाले आहे. या प्रवासात ज्यांनी मदतीचा हात दिला, त्यांचा मी सदैव ऋणी आहे. आता मीही गरजुंच्या मदतीला तत्पर राहीन.

राजेश चौधरी, सीए, अहिल्यानगर

(पान १ वरून)

## प्रवीण रसाळसह १० जणांची निर्दोष मुक्तता

फिर्यादी शरद पवार आणि जखमी सुनील पवार यांच्या साक्षींसह वैद्यकीय पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आले. मात्र, तलवार आणि इतर शस्त्रांच्या जप्तीबाबत साखळी पुरावा सादर करण्यात आला नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.
हॉटेल मंथनजवळ पोलीस चौकी असूनही घटनेनंतर तत्काळ माहिती दिली गेली नाही, तसेच स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार न्यायालयासमोर सादर झाले नाहीत, हेही न्यायालयाने नमूद केले.

वैद्यकीय अहवालानुसार जखमा गंभीर असल्या तरी त्यातून खुनाचा हेतू सिद्ध होत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. त्यामुळे आरोपींनी खुनाचा प्रयत्न केला किंवा दंगल घडवून आणली, हे सिद्ध झाले नसल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आला.

सत्र न्यायालयाने सर्व आरोपींना संबंधित सर्व कलमांतील आरोपांतून निर्दोष मुक्त केले. तसेच,आरोपींचे जामीननामे रद्द करण्यात आले असून प्रत्येक आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ अ नुसार १५ हजार इतक्या रकमेचा पी.आर. बाँड व तितक्याच रकमेचा जामीनदार सादर करावा, असा निर्देश देण्यात आला आहे. फरार आरोपीविरुद्ध स्वतंत्र पूरक आरोपपत्र दाखल करण्यासही न्यायालयाने सांगितले आहे. आरोपींच्या वतीने अँड. परिमल फळे ॲड पंकज खराडे यांनी काम पाहिले.
जखमी सुनील पवार यांची उलटतपासणी तसेच डॉक्टरांच्या उलट तपासणीत विरोधाभास दिसून आला. त्यामुळे सर्व आरोपींची केसमधून निर्दोष मुक्तता झाली अँड. परिमल फळे यांनी घेतलेली उलटतपासणी मुळे या खटल्याला कलाटणी मिळाली.

## तिघांचा जीव घेणारा नरभक्षक बिबट्या अखेर ठार!

अंदाजे सहा वर्ष वयाचा नर जातीचा हा नरभक्षक बिबट्या असून, १३ वर्षीय रोहनचा जीव ज्या ठिकाणी घेतला तिथून केवळ ४०० मीटर अंतरावर या बिबट्याला ठार करण्यात आले. नमुन्यांवर आणि ठशांवरून हा तोच नरभक्षक बिबट्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बिबट्याच्या हल्ल्याने झालेल्या मृत्यूंनंतर संतप्त नागरिकांच्या मागणीची दखल घेत अखेर शिरूर तालुक्यातील दोन बालकांसह तिघांचा जीव घेणाऱ्या या बिबट्याला दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश वनविभागाकडून देण्यात आले होते. काही दिवसांपूर्वी पिंपरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्यात पाच वर्षांच्या शिवन्या बोंबे हिचा मृत्यू झाला होता. २२ ऑक्टोबर रोजी भागाबाई रंगनाथ जाधव (वय ७०, रा. जांबुत, ता. शिरूर) या वृद्ध महिलेला याच बिबट्याने ठार केले होते. त्यानंतर शनिवारी (दि. १) रोहन विलास बोंबे (वय १३) या मुलावर बिबट्याने हल्ला करून त्याचा मृत्यू घडवून आणला.

सातत्याने नागरिकांवर होणाऱ्या बिबट्याच्या हल्ल्यांमुळे परिसरात तीव्र दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी नागरिक सातत्याने करत होते; मात्र प्रयत्नांनंतरही ती यशस्वी होत नव्हती. यामुळे आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी आंदोलन करत जाळपोळदेखील केली होती. अखेर या नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात वनविभागाला यश मिळाले आहे.

दिवसभरात परिसरात विविध ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून बिबट्याच्या भ्रमण मार्गावरील ठशांचे निरीक्षण करण्यात आले. त्यानंतर रात्री तीन थर्मल ड्रोनच्या माध्यमातून घटनास्थळाच्या परिसरामध्ये त्या नरभक्षक बिबट्याचा शोध घेतला असता, घटनास्थळापासून सुमारे ४०० ते ५०० मीटर अंतरावर बिबट्या दिसून आला. त्यास बेशुद्ध करण्यासाठी डार्ट मारण्यात आला, परंतु तो अपयशी ठरल्याने बिबट्या चवताळून प्रतिहल्ला करत असताना बंदूकधारी शार्प शूटरांनी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास त्याच्यावर गोळी झाडली. त्यामुळे नर बिबट्या मृत झाला असून त्याचे वय अंदाजे पाच ते सहा वर्ष असल्याचे दिसून आले.

यानंतर सदर नरभक्षक बिबट्याचे शव मौजे पिंपरखेड येथील ग्रामस्थांना दाखविण्यात आले, त्यानंतर ते शवविच्छेदनासाठी माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे हलविण्यात आले.

**वनविभागाचे सक्सेस ऑपरेशन**

पिंपरखेड येथील मुलाचा बिबट्याने बळी घेतल्यानंतर पिंपरखेड परिसरातील वन्यप्राणी बिबट्यास जेरबंद किंवा ठार करण्यासाठी वनसंरक्षक पुणे आशिष ठाकरे यांनी तातडीने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची परवानगी घेतली होती. सदर नरभक्षक बिबट्या जेरबंद किंवा ठार करण्यासाठी वनविभागाने रेस्क्यू संस्था पुणेचे डॉ. सात्विक पाठक (पशु चिकित्सक), जुबिन पोस्टवाला आणि डॉ. प्रसाद दाभोळकर या दोन शार्प शूटरांसह वनविभागाची टीम घटनास्थळ परिसरात तैनात केली होती. दिवसभरात परिसरात विविध ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून बिबट्याच्या भ्रमण मार्गावरील ठशांचे निरीक्षण करण्यात आले होते. अखेर रात्री १०:३० वाजता या बिबट्याला ठार करण्यात यश आले.

## राळेगणसिध्दीत एटीएम फोडले

एटीएमजवळ साधारण पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास पोहचले. त्यांनी गॅस कटरने एटीएम फोडून त्यातील चार पैकी दोन बॉक्समधील रक्कम लांबविली. स्थानिकांनी दिलेल्या माहीतीनुसार सीसीटीव्ही फुटेजनुसार टाटा कंपनीच्या हॅरीअरमधून आलेल्या वाहनाचा नंबर औरंगाबाद आरटीओ पासिंगचा असून त्याचा पुर्ण नंबर आढळून येत नाही.

एटीएम फोडल्याचा प्रयत्न होताच बँकेच्या अधिकाऱ्यांना तशी सूचना त्यांच्या मोबाईलवर गेली. त्यांनी पारनेर पोलीसांशी संपर्क केल्यानंतर पोलिसही तात्काळ घटनास्थळी हजर झाले. त्यांनी श्वान पथक तसेच इतर यंत्रणांच्या मदतीने आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तांबे-विखेंचा युवा शिलेदार निवडणुकीच्या रिंगणात !

## गोरेगांवचा अण्णा पाटील समाजकारणातून राजकारणाकडे

गोरेगांव : प्रतिनिधी

मॉडेल व्हिलेज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोरेगांव या गावात जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब तांबे यांचे कार्यकर्ते म्हणून काम करताना राजकारण निवडणुकीपुरते आणि समाजकारण ३६५ दिवस या ब्रीदवाक्याने काम करणारा युवक म्हणजे अण्णा पाटील नरसाळे. मा. खा. सुजय विखे पाटील यांचा युवा शिलेदार म्हणून त्यांची ओळख संपूर्ण तालुकाभर झाली आहे.




### शेती, महिला आणि सर्वसामान्यांसाठी उपक्रम

बाबासाहेब तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व सरपंच सुमनताई तांबे यांच्या सहकार्याने अण्णा पाटील यांनी गावात विविध योजना राबविल्या. ५५ गाईच्या गोठयांना मंजुरी, २८ घरकुल योजना मंजुर, ३२ विहिरींसाठी मंजुरी, शेतकरी विमा योजनेसाठी मोफत ऑनलाईन सुविधा, महिलांसाठी आरोग्य तपासणी कॅम्पचे आयोजन आदी ठळक कामे त्यांनी मार्गी लावली आहेत.

### दुष्काळात पाण्याचा टँकर

सन २०१७ मध्ये दुष्काळी परिस्थिती असताना अण्णा पाटील यांनी स्वतःच्या ट्रकमध्ये पाण्याची टाकी बसवून मोफत पाणीपुरवठा सुरू केला. हा उपक्रम गावकऱ्यांसाठी देवदूतासारखा ठरला. या कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी लोकनियुक्त सरपंच सुमनताई तांबे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत निवडणुकीत सहभाग घेतला आणि समाजसेवेच्या नव्या अध्यायाची सुरूवात झाली.

### जनतेशी नाळ जोडणारा उपसरपंच

गावातील समस्या असोत किंवा शासकीय दप्तरातील अडथळे, लोकांच्या मदतीला नेहमी पुढे हेच अण्णा पाटील यांचे कामाचे सुत्र आहे. त्यांच्या सक्रिय लोकसंपर्कामुळे आणि कामगिरीमुळे गावकऱ्यांचा विश्वास जिंकत त्यांनी उपसरपंचपदाची जबाबदारी स्वीकारली. कोरोना काळात गावासाठी स्वतंत्र कोविड सेंटर उभारून संकटातही सेवा देण्याचे उदाहरण घालून दिले.

### जनसेवेकडून राजकारणाकडे वाटचाल

डॉ.सुजय विखे यांच्या माध्यमातून त्यांनी संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य म्हणून निवड झाली. या पदाच्या माध्यमातून त्यांनी जवळपास ३०० नागरिकांना संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळवून दिला. विखे पाटील हॉस्पिटलमार्फत गावकऱ्यांना आरोग्य सेवा मिळवून देणे, गरजूंसाठी ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून देणे आणि वृध्दांना तसेच कस्तीपटूंना पाठिंबा देणे अशी अनेक सामाजिक कामे त्यांच्या नावे आहेत.

### पाटलांची गाडी मदतीचं प्रतीक !

गावात कुणी अडचणीत असलं की फक्त एक फोन, आणि अण्णा पाटलांची गाडी लगेच तिथे पोहचते. आकस्मिक प्रसंगात ती ॲब्युलन्स बनते, विद्यार्थ्यांसाठी प्रवासाचे साधन तर शेतकऱ्यांसाठी कामाची गाडी बनते. त्यामुळेच गावकऱ्यांत अण्णा म्हणजे आपला माणूस असा विश्वास दृढ झाला आहे.

### युवा नेतृत्वाचा उदय, निवडणुकीकडे वाटचाल

गावातील महिलांचा लाडका भाऊ, वृध्दांचा विश्वासू मित्र आणि युवकांचा आधारस्तंभ म्हणून ओळख निर्माण करत अण्णा पाटील नरसाळे यांनी आता पुढील टप्प्याचे तयारी सुरू केली आहे. भाळवणी पंचायत समिती गणातून उमेदवारीसाठी ते तयार झाले आहेत. मा. खा. डॉ. सुजय विखे आणि मा. सभापती बाबासाहेब तांबे यांच्या आशीर्वादाने हे तरूण नेतृत्व आता तालुका पातळीवर अध्याय लिहिण्यास सज्ञ झाले आहे.

# नारायणगव्हाणमध्ये चौपदरीकरणासाठी संताप उसळला!

## १० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर लोटांगण आंदोलन

नारायणगव्हाण : प्रतिनिधी

नगरपुणे महामार्गावरील नारायणगव्हाण गावाजवळील अपूर्ण चौपदरीकरणाचे काम अनेक वर्षांपासून रखडल्याने नागरिकांचा संयम अखेर सुटला आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांनी संतापाच्या ठिणग्या उडवल्या असून, १० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ग्रामस्थ लोटांगण आंदोलन करणार आहेत.



### अपूर्ण चौपदरीकरणामुळे वाढते अपघात

नगरपुणे महामार्गावरील नारायणगव्हाण परिसरात रस्त्याचे चौपदरीकरण दीर्घकाळापासून अर्धवट अवस्थेत आहे. वाढत्या वाहतूक दाबामुळे हा रस्ता नागरिकांसाठी जीवघेणा ठरत असून, शाळकरी मुले, प्रवासी आणि ग्रामस्थ सतत भीतीच्या छायेत वावरत आहेत.या पार्श्वभूमीवर गावकरी आणि आंदोलनकर्ते सचिन बबन शेळके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या विनंतीपत्राद्वारे प्रशासनाला धारेवर धरले आहे.

### १० नोव्हेंबरला निर्णायक लढा

ग्रामस्थांनी १० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर लोटांगण आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. ''या आंदोलनादरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील,'' असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

### 'प्रशासनाचा वेळकाढूपणा असह्य'

सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी पूर्वी सुमारे ९८५ मीटरपर्यंतचे चौपदरीकरण पूर्ण करून दिले होते. मात्र उर्वरित भागात जाणीवपूर्वक वेळकाढूपणा होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.''नगरपुणे महामार्गासह नारायणगव्हाण चौपदरीकरणाच्या प्रलंबित कामांबाबत प्रशासन नागरिकांच्या जीवाशी खेळत आहे. वेळकाढूपणा अधिक सहन केला जाणार नाही. अपघातांस जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल झाल्याशिवाय नागरिक गप्प बसणार नाहीत.'' शरद पवळे यांनी सांगितले.

### 'कामचुकार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा'

विनंतीपत्रात नमूद करण्यात आले आहे की, अनेकदा निवेदनं दिल्यानंतरही प्रशासनाने ठोस पावले उचललेली नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे.ग्रामस्थांनी चार ठोस मागण्या पुढे केल्या आहेत. अपघातांना जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, महामार्ग दोन्ही बाजूंनी दुचाकींसाठी स्वतंत्र साईडपट्टीसह सुरक्षित करण्यात यावा , नारायणगव्हाण येथील भूसंपादनग्रस्तांना योग्य मोबदला देऊन तातडीने उर्वरित चौपदरीकरण सुरू करावे, गावात कायमस्वरूपी ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात यावी.

### अण्णा हजारे आणि वरिष्ठ प्रशासनालाही पत्र

या विनंतीपत्राची प्रत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार, तसेच सुपा व पारनेर पोलीस ठाणे यांना सादर करण्यात आली आहे.

# अनिकेत झावरे यांचे चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत यश

## जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळविले यश

पारनेर : प्रतिनिधी

परिस्थितीवर मात करत जिद्दी आणि चिकाटीच्या जोरावर यश मिळवणारा एक तरुण म्हणजेच अनिकेत मंगल रावसाहेब झावरे! पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील या विद्यार्थ्याने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत घवघवीत यश संपादन करून आपल्या कुटुंबाचे, शिक्षकांचे आणि गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.



अनिकेतच्या या यशाबद्दल राज्याचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील,जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील,माजी खासदार सुजय विखे पाटील, तसेच प्रवरा परिवारातील पदाधिकारी, अळकुटी महाविद्यालय व्यवस्थापन समिती, प्राध्यापक व कर्मचारीवर्गाने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमास प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, प्रा. संदीप गेटम, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. संजय जाधव, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. पोपट सुंबरे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. राजाराम गोरडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. सुप्रिया पारखे, तसेच विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रतिकूल परिस्थितीतून उभं राहिलेलं स्वप्न

अनिकेतचे बालपण आणि शिक्षण साध्या परिस्थितीत झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण अळकुटीच्या जिल्हा परिषद शाळेत, माध्यमिक शिक्षण साईनाथ हायस्कूलमध्ये, तर उच्च माध्यमिक आणि पदवी शिक्षण पारनेर महाविद्यालयात झाले आहे.वडील प्रा. रावसाहेब झावरे आणि आई मंगल झावरे यांनी अनेक अडचणींवर मात करत मुलाला शिक्षण दिले, तर अनिकेतनेही आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करत सीए बनण्याचा मान मिळविला.

### वासुंदे मूळ गाव, अळकुटी कर्मभूमी

अनिकेतचे मूळ गाव वासुंदे (ता. पारनेर) असले, तरी अळकुटी गावानेच त्याला घडवलं आणि संधी दिली. अळकुटी हीच त्याची खरी कर्मभूमी ठरली.

### अळकुटी महाविद्यालयाचा अभिमान

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे प्रा. रावसाहेब झावरे यांचे चिरंजीव अनिकेत यांनी सीए परीक्षेत यश मिळवून महाविद्यालयाचा अभिमान वाढविला आहे.महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी अनिकेतचा सत्कार करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### जिद्द, चिकाटी आणि कुटुंबाचा पाठिंबा

प्रतिकूल परिस्थिती असूनही न डगमगता स्वप्न साकार करणाऱ्या अनिकेत झावरे याचे हे यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.त्याच्या जिद्दीला आणि पालकांच्या अथक प्रयत्नांना आज सर्वत्र सलाम केला जात आहे.

# कलावंतांचा आवाज मंत्रालयापर्यंत पोहोचवू

## कलावंतांना मानधन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार । रविंद्र राजदेव यांची ग्वाही



सावरगाव : प्रतिनिधी

बाळासाहेब शिरतार मित्र मंडळाच्या वतीने सावरगाव येथे आयोजित ''कलावंत सन्मान सोहळा व पुरस्कार वितरण कार्यक्रम'' उत्साहात पार पडला. या सोहळ्यात महाराष्ट्रभरातील नामवंत कलावंत, शाहीर, पत्रकार आणि समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सरोदे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून रविंद्रशेठ राजदेव, कादंबरी पतसंस्थेचे चेअरमन दिनेश आग्रे, सुनील बर्वे, दत्ता जाधव, दत्ता गायकवाड, वसंत जगताप, बाळाशीराम पायमोडे, रामदास साळवे, संतोष शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

कलाक्षेत्रातील प्रसिद्ध मंडळींमध्ये बशीरभाई खामुंडीवाले, इस्माईलभाई, तसेच महाराष्ट्र राज्य छत्रपती शिवराय कलगी-तुरा संघटनेचे अध्यक्ष शाहीर रामदास गुंड यांची उपस्थिती विशेष ठरली.त्याचप्रमाणे जागरण गोंधळ पार्टीचे कलावंत, पत्रकार संजय मोरे आणि पत्रकार गणेश जगदाळे यांनीही कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### कलावंत समाजातील वंचित घटक : रविंद्र राजदेव

या प्रसंगी बोलताना रविंद्र राजदेव म्हणाले,''कलावंत हा समाजातील वंचित घटक आहे. त्याला शासनाकडून पुरेशी दखल मिळत नाही. त्याच्या कलेला ना सन्मान मिळतो, ना योग्य मानधन. पण जर कलेला वाव मिळाला, तर ती कला जोमात बहरू शकते.''राजदेव यांनी पुढे सांगितले की, ''कलावंतांना त्यांच्या कलेचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी आणि शासनाकडून न्याय मिळवून देण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार आहे. कलावंतांचा आवाज मंत्रालयापर्यंत पोहोचवला पाहिजे. जर सरकारच्या कानावर हा आवाज गेला, तर निश्चितच त्यांना हक्काचे मानधन आणि ओळख मिळेल.''

### बाळासाहेब शिरतार यांचा गौरव

कार्यक्रमात बाळासाहेब शिरतार यांची महाराष्ट्र राज्य कलावंत असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.या प्रसंगी जळगाव, बीड, पुणे, सांगली, कोल्हापूर, जुन्नर आणि संगमनेर येथून आलेल्या असंख्य कलावंतांनी एकत्र येऊन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### कलावंतांच्या ऐक्याची गरज

राजदेव यांनी सर्व कलावंतांना एकत्र येण्याचे आवाहन केले.''आपण सगळ्यांनी एकजूट दाखवली, तर शासनाला कलावंतांचा आवाज ऐकावा लागेल. ही कला आणि कलाकार वाचविण्याची वेळ आता आली आहे,'' असे ते म्हणाले.

### कलाकारांची एकजूट हवी

कार्यक्रमाच्या शेवटी कलावंतांनी 'कलावंतांच्या हक्कासाठी एकत्र येऊया' असा नारा दिला.संपूर्ण सभागृहात ''जय कला! जय कलाकार!!'' या घोषणांनी वातावरण दणाणून गेले.



### कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे !

महायुतीमधील घटकपक्ष शिवसेना पक्षात जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे यांच्या प्रवेशानिमित आयोजित मेळाव्यास्थळी लावण्यात आलेल्या शिवसेनेच्या ध्वजाला बांधण्यासाठी राष्ट्रवादीच्या गमजाचा आधार घेण्यात आला असून मंडपाच्या अग्रस्थानी असलेला हा ध्वज चर्चेचा विषय ठरला आहे.

# ''भक्तीच्या स्वरांनी गुंजणार पळवे खुर्द गाव''

## श्री काळभैरवनाथ जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

पळवे खुर्द : प्रतिनिधी

पळवे खुर्द येथे श्री काळभैरवनाथ जयंती निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भक्तिमय उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर ते गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. यंदाचे हे १४ वे वर्ष असून संपूर्ण ग्रामस्थांच्या सहभागातून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.



### नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती

या सोहळ्यात महाराष्ट्रातील अनेक प्रसिद्ध कीर्तनकार सहभागी होणार आहेत. गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर - ह. भ. प. सोमनाथ महाराज बारगळ सर (पळवे खुर्द), शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर - ह. भ. प. विकास महाराज देवडे (गायनाचार्य, कर्जत), शनिवार, दि. ८ नोव्हेंबर - ह. भ. प. सागर महाराज बोराटे (नातेपुते), रविवार, दि. ९ नोव्हेंबर - ह. भ. प. लक्ष्मण महाराज नांगरे (देवगड संस्थान), सोमवार, दि. १० नोव्हेंबर -ह. भ. प. ज्योतीताई धनाडे (भागवताचार्य, अंबड-जालना), मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर - ह. भ. प. पांडुरंग महाराज शितोळे (शास्त्री, आळंदी देवाची), बुधवार, दि. १२ नोव्हेंबर -ह. भ. प. श्रीकांत महाराज दुराफे (आळंदी देवाची), गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर -ह. भ. प. अंकुर महाराज साखरे (किर्तन केसरी, बीड-गेवराई) यांचे काल्याचे कीर्तन सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत होणार आहे.

### महाप्रसाद, सेवा आणि भक्तिभावाची परंपरा

दररोज सकाळ-सायंकाळ महाप्रसादाची व्यवस्था, आलेल्या महाराजांसाठी चहा-नाश्ता प्रसाद, तसेच भाविकांच्या सोयीसाठी लाईट मंडप, डेकोरेशन, पार्किंग, चोपदार व्यवस्था उत्कृष्टरीत्या करण्यात आल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शशिकांत आप्पा देशमुख यांनी दिली.

### अखंड नामस्मरणाचा ध्यास

दररोज पहाटे ४ ते ६ वाजेपर्यंत काकड आरती, त्यानंतर ८ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ वाजता गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ हरिकिर्तन, त्यानंतर महाप्रसाद व रात्रभर हरीजागर अशा अखंड भक्तीच्या लयीत संपूर्ण आठवडा दुमदुमणार आहे.

### भाविकांना आवाहन

या सप्ताहात पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिमय कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अशी विनंती आयोजक मंडळाकडून करण्यात आली आहे. पळवे खुर्द ग्रामस्थांच्या भक्तीभावातून साकारलेला हा हरिनाम सप्ताह केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर एक संस्कारमहोत्सव ठरणार आहे.

# विकासाची दृष्टी असणाऱ्या माणसांबरोबरच रहा

## सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादन । श्री केशव गोविंद मंदिराच्या सभामंडपाचे भूमिपूजन

भाळवणी : प्रतिनिधी

''गावाच्या सर्वांगीण विकासाची दृष्टी ठेवून समाजाच्या प्रत्येक घटकाच्या गरजा पूर्ण करणे हे माझे ध्येय आहे. श्रद्धास्थान असलेल्या श्री केशव गोविंद मंदिराच्या सभामंडपाच्या कामाला सुरुवात होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने हे काम लवकर पूर्ण होईल आणि मंदिर परिसर अधिक सुंदर व उपयुक्त बनेल. यापुढील काळात सुद्धा विकासाची दृष्टी असणाऱ्या माणसांबरोबरच सर्वांनी राहिले पाहिजे,'' असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केले.



भाळवणी गावातील श्रद्धास्थान असलेल्या श्री केशव गोविंद मंदिरासमोरील सभामंडप बांधकामाचे भूमिपूजन सुजित झावरे पाटील व सौ. सविताताई झावरे यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते.

या समारंभाला नानासाहेब रोहोकले, संदीप कपाळे, सुरेश रोहोकले, प्रमोद जोशी, लक्ष्मण चेमटे, नामदेव रोहोकले, प्रभाकर रोहोकले, बबन भुजबळ, ठकचंद रोहोकले,जितेंद्र रोहोकले,ए. डी.चेमटे , आनंदा रोहोकले,प्रकाश रोहोकले, दीपक रोहोकले, रोहिदास रोहोकले, बाबुशेठ रोहोकले, मुक्ताजी चेमटे, गणेश रोकडे, नंदू चेमटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.सभामंडपामुळे मंदिर परिसरात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

### दोन महिन्यातच मागणी पूर्ण

ग्रामस्थांनी दोन महिन्यांपूर्वी सभामंडपासाठी निधीची मागणी केली होती. झावरे पाटील यांनी तातडीने निधी मंजूर करून अवघ्या दोन महिन्यांत कामाला सुरुवात केली, ज्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व कृतज्ञतेची भावना व्यक्त होत आहे.

### विकासात्मक कामे मार्गी लागली

भाळवणी हे मोठे बाजारपेठेचे गाव असून या गावाच्या विकासासाठी सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून आजपर्यंत मोठा निधी उपलब्ध झाला आहे. गावातील पिण्याचे पाणी, स्थानिक रस्ते, वीज तसेच धार्मिक व सामाजिक प्रश्न प्रामुख्याने झावरे पाटील यांनी सोडवले आहेत.तसेच अनेक विकासात्मक कामे मार्गी लावली आहेत.आगामी काळातही विकासात्मक कामांसाठी त्यांच्याकडेच पाठपुरावा करणार आहे.

संदीप कपाळे,भाळवणी

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com